# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## प्रेस नोट

**दिनांक ०३/०५/२०२२ (मंगळवार)**

**(सायंकाळ)**

---

## अनोळखी इसमाचा खून

**पो.स्टे. पारशिवनी :-** अंतर्गत ०७ कि. मी अंतरावर मौजा इटगाव शिवार ते दिगलवाडी पांधन रोड वरील गौरव सादतकर यांचे शेतात येथे दिनांक ०२/०५/२०२२ चे १९.०० वा. ते दिनांक ०३/०५/२०२२ चे ०६.०० वा. दरम्यान अज्ञात आरोपीने अज्ञात कारणावरून यातील मृतक अनोळखी पुरूष, वय अंदाजे २५ ते ३० वर्ष यास कोणतेतरी धारदार हत्याराने पोटावर, खांदयावर, पाठीवर, गळयावर वार करून जिवानिशी ठार केले व पुरावा नष्ट करण्याचे उद्देशाने शेतमालक गौरव सादतकर यांचे शेतातील झोपडी व तनसाचे ढिगाला आग पेटवुन दिल्याचे चौकशी निष्पन्न होत असल्याने सदर गुन्हा नोंद.

सदर प्रकरणी सरतर्फे पोहवा रविन्द्र चौधरी पो.स्टे. पारशिवनी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. पारशिवनी येथे आरोपीविरुध्द कलम ३०२, २०१, ४३६ भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलिस निरीक्षक श्री. सोनावणे हे करीत आहे. सदर प्रकरणात पो.स्टे पारशिवनी येथे मा. पोलिस अधीक्षक नागपुर ग्रामीण श्री. वियजकुमार मगर, अप्पर पोलिस अधीक्षक श्री राहुल माकणीकर, उपविभागीय पोलिस अधिकारी श्री आर.एस.चव्हाण व स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. ओमप्रकाश कोकाटे यांनी भेट दिलेली आहे.

**मृतकाचे वर्णन**:- वय अंदाजे २५ ते ३० वर्ष, रंग- गोरा, उंची- ५ फुट ७ इंच अंदाजे, उजव्या हातावर 'महाकाल' असे लिहलेले असून डाव्या दंडावर हनुमान (फोटो) गोंदलेला आहे, हातात पांढऱ्या धातुचा कडा, गळ्यात काळा धागा त्यामध्ये ताविज बांधलेले, केस- कटींग साईड कट बारीक, फ्रेंच कट दाढी, पॅरागान कंपनीची चामडी शॅडल, अंगात- फिक्कट गुलाबी रंगाचे फुल बाह्याचे शर्ट, निळ्या रंगाची नाईट पॅन्ट घातलेला आहे.

वरील वर्णनाच्या अनोळखी इसमाबाबत कुठे मिसिंग दाखल असल्यास अथवा कुणी ओळखत असल्यास खालील ठिकाणी संपर्क करुन कृपया त्वरित माहिती द्यावी.

सर्व ठाणेदार, यांनी आप-आपल्या पोस्टे चे मिसींग रजिस्टर तसेच मागील २ वर्षाचे अटक रजिस्टर (गोंदलेल्या मार्क प्रमाणे) व वर्णना प्रमाणे चेक करून मिळुन आल्यास पो.स्टे. पारशिवणी येथे कळवावे हि विनंती.

पो.स्टे. पारशिवनी ठाणेदार १) पोलिस निरीक्षक श्री. सोनावणे मो.क्र. ७०२०५७७४५९, २) पोनि ओमप्रकाश कोकाटे ९९२३४८०८०४, ३) सपोनि राजीव कर्मलवार ९०२१४५२७६०, ४) सपोनि जितेंद्र वैरागडे ९४२०१७८६७४, ४) सपोनि अनिल राऊत ८६६८३८५५७६ स्थानिक गुन्हे शाखा, नागपूर ग्रामीण यांचेशी संपर्क करावा.





**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**